**जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना “कार्यालय प्रमुख” व “आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- डिडिओ ०९२६ /प्र.क्र.१७५/कार्यासन-१२**
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२
दिनांक :- २२ ऑक्टोबर, २०२६

वाचा :-

१) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. न्यायस्था २०२५/प्र.क्र.२२७/का-१२, दि.११.०३.२०२५.
२) विधि व न्याय विभाग, शासन अधिसूचना क्र. न्यायस्था २०२५/प्र.क्र.२२७/का-१२, दि.०३.०९.२०२६.
३) प्रबंधक (निरीक्षण-१), मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे पत्र क्र.B(W)A-२१०३ of २०१२/२०२१/४४९४८, दि.२८.०९.२०२६.
४) जिल्हा न्यायालय,उस्मानाबाद यांचे पत्र क्र.जा.क्र.रोविले/७७५६/२६, दि.२२.०९.२०२६
५) जिल्हा न्यायाधीश-१व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांचे पत्र जा.क्र./प्रशा/३८/२०२६, दि.२१.०९.२०२६

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये तुळजापूर,जि.धाराशिव येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास व त्यानुसार पद निर्मिती करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. संदर्भाधीन अ.क्र.२ येथील दि.०३.०९.२०२६ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये दि.०६.०९.२०२६ पासून सदर न्यायालय कार्यान्वित झाले आहे. संदर्भाधीन अ.क्र.३ ते ५ येथील पत्रांन्वये केलेल्या विनंतीनुसार जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय,तुळजापूर, जि.धाराशिव या न्यायालयाकरीता जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना कार्यालय प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद या न्यायालयाकरिता जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना "कार्यालय प्रमुख" व "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर न्यायालयातील सर्व प्रकारची देयके कोषागारात सादर करण्यासाठी त्यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर आदेश वित्तीय बाबीपुरतेच मर्यादित राहतील

२. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ११.०८.२०२६ सोबतच्या वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग एक मधील अनुक्रमांक३ येथे नमूद नियम क्रमांक २ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार तसेच महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम १५(३) व १५६ अन्वये व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२८३/२०२६/कोषा प्रशा-५, दि.०९.१०.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०२३/प्र.क्र.८८/२३/कोषा-प्रशा-५, दि.०३.१०.२०२३ मधील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन करणे अनिवार्य राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६१०२२१६०२५०४२१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS V GAIKWAD

Digitally signed by VILAS V GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department, 2.5.4.20=64F5AB9E019C90AD5DB684984DF113ED09062245CB9E042BE5B12E5AA482FC17, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CD7BB8BAA2D72280DD453A12422482D4768A126C83ECB44E84A8186EED4352A0, cn=VILAS V GAIKWAD
Date: 2026.10.22 16:04:05 +05'30'

**(विलास वसंत गायकवाड)**
**विधि सल्लागार नि सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) प्रबंधक (निरिक्षणे-१/२), मा.उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
२) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय,उस्मानाबाद
३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), १/२महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
४) जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, तुळजापूर, जि.उस्मानाबाद
५) जिल्हा कोषागार अधिकारी, धाराशिव.
६) उपकोषागर अधिकारी, तुळजापूर,जि.धाराशिव
७) कक्ष अधिकारी, कोषा-(प्रशा-५)/विनियम/व्यय-५, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
८) कक्ष अधिकारी,कार्यासन २३/२० विधि व न्याय विभाग,मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती कार्या-१२